# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०५.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०४/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ८८,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०४/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण १३ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अपघात** :—दिनांक ०४/०८/२०२२ रोजी फिर्यादी शिवाजी प्रल्हाद पंडीत रा येलदरी कॅम्प ता जितुंर जि परभणी यांचे फिर्यादी वरून पोस्टे सेनगाव येथे कलम २७९,३७,३३८,३०४अ,४२७ भादवी सह कलम १३४/१७७ मो.वा.का प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१६.०७.२०२२ रोजीचे १५.४५ ते १६.०० वा सेनगाव ते येलदरी रोडवर लिंबाळा तांडयाचे जवळ गौशाळेजवळ वळण रोडवर अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन यातील मयत नामे विश्वनाथ गंगाधर सोनटक्के वय ४० रा मुरूमखेडा ता जितुंर जि परभणी ह.मु. येलदरी कॅम्प ता जितुंर जि परभणी यांची मोटार सायकल क्र एमएच २२ ऐ वाय ३१०५ ला समोरून धडक देवुन मयताचे मरणास कारणीभुत झाला व मोटार सायकल चे समोरील डोम फुटुन अंदाजे १५०० रू चे नुकसान केले वैगरे फिर्याद वरून सदरचा गुन्हा दाखल होवुन या संदर्भात सेनगाव पोलीस तपास करित आहेत.

**चोरी** :— दिनांक ०४/०८/२०२२ रोजी फिर्यादी भाउराव फालाजी वैदय रा शास्त्रीनगर जवळा बा.ता औढा ना यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०४.०८.२०२२ रोजीचे ११.०० वा चे पुर्वी माहे जुलै २२ चे दरम्याण वेळ नक्की नाही अज्ञात आरोपीने दि.०२.०८.२०२२ रोजीचे ११.०० वा चे पुर्वी माहे जुलै महिन्याचे दरम्याण यातील फिर्यादीचे ट्रॅक्टर ची बॅटरी लिव्हगार्ड 80AHA4ZCABT605276BB कंपनीची किमंती ७००० रू व एक साउंड बॉक्स कि २५०० असा एकुण ९,५०० रू चा माल अज्ञात चोरटयाने चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.